क्रांतीवीर

# इंदूताई पाटणकर

डॉ. बाबुराव गुरव

निर्मिती विचारमंच, कोल्हापूर.

क्रांतीमाता

## लक्ष्मीबाई रामचंद्र नायकवडी

क्रांतीवीर

## राजूताई बळवंतराव बिरनाळे

आणि

## श्रीमती भागिर्थी रामचंद्र गुरव

यांना सादर समर्पण...

## प्रस्तावना...

बहुजन स्त्री-शुद्रातिशुद्र समाजातील अनेक मान्यवरांची चरित्रे-आत्मचरित्रे प्रसिध्द होताहेत. त्यामुळे बहुजन समाजाची वाटचाज समजायला भरपूर मदत होते आहे. संशोधन कार्यात महत्त्वाचे दुवे हाती लागतात. अनेक तपशील हाताशी येतात. राजर्षि शाहू महाराजांचे प्रथम समग्र चरित्र ॲड. अण्णासाहेब लठ्ठे यांनी लिहिले आहे. त्यानंतर शाहू महाराजांवर अक्षरश: शेकडो पुस्तके लिहिली गेली. शासनाच्या वतीने समग्र ग्रंथ प्रसिध्द झाला. चरित्राबरोबरच आता चळवळीतील मोठ्या नेत्यांनी लिहिलेले ग्रंथही उपलबध झाले आहेत. त्यातूनही चळवळीची अनेक अंगे प्रकाशात येताहेत. १९४२ चा लढा, विशेषत: साताऱ्याकडील प्रतिसरकार, १९५५ चा गोवा मुक्तीसंगाम, १९५७ चा संयुक्त महाराष्ट्र लढा, १९७५ सालची आणिबाणी अशी काही उदाहरणे सांगता येतील. त्यामुळे समाजकारण, अर्थकारण, राजकारण समजून घ्यायला मदत होते. मात्र मला यांत एक उणीव सतत भासते. महत्मा फुल्यांनी स्त्रीशुद्रातिशुद्र असा शब्द प्रयोग वापरला आहे. बहुजन शब्दाचे ते स्पेलिंग आहे. यातील शुद्रातिशुद्रातील पुरूषांनी लिहिलेले साहित्य मोठ्या प्रमाणांत प्रसिध्द झाले आहे. त्यामानाने स्त्रियांनी लिहिलेले साहित्य, चरित्रे, आत्मचरित्रे फारच थोडी आहेत. महात्मा गांधी, फुल्यांच्या काळात ताराबाई शिंदे यांचे स्त्री-पुरूष तुलना हे पुस्तक प्रसिध्द झाले. परंतु बाइच्या व्यक्तीगत जीवनपटाचा धांडोळा कांही अद्याप हाती आलेला नाही.

या पार्श्वभूमीवर इंदुताई पाटणकरांचे समग्र चरित्र प्रसिध्द होणे ही घटना मला उल्लेखनीय वाटते. खरे म्हटले तर इंदुताईंनी आत्मचरित्रच लिहायला हवे. त्याचे महत्त्वाचे कारण म्हणजे त्यांच्या जीवनातील बंडखोरी. मराठा समाजात अशी